REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2022

# “पूर्व विदर्भातील आयुर्वेदिक उत्पादनात कच्च्या मालाच्या स्वरूपात औषधी वनस्पतीच्या स्त्रोतांच्या वापर व खरेदी: एक विश्लेषणात्मक अध्ययन”

अक्षय गंगाधर काचोरे[1] , डॉ. अरुण नत्थुजी दसोड[2]
[1]संशोधनकर्ता
[2]मार्गदर्शक, शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पांढरकवडा, ता. केळापूर, जि. यवतमाळ

**सारांश**

प्रस्तुत संशोधनाकरिता पूर्व विदर्भातील १२० विक्री प्रतिनिधीची निवड करून त्यांच्याकडून तथ्य संकलित करण्यात आले. संशोधनात प्राप्त परिणाम दर्शवितात की, आजच्या स्पर्धात्मक युगात कुठल्याही नवीन उत्पादनाची सुरूवात चांगल्या व्यवसायिक धोरणांनी करणे अतिआवश्यक आहे. धोरणामुळे उत्पादनासंबंधी जागरूकता आणण्यात मदत होते. वरील संशोधनात पूर्व विदर्भातील आयुर्वेदिक उत्पादनात कच्च्या मालाच्या स्वरूपात औषधी वनस्पतीच्या स्त्रोतांच्या वापर व खरेदी धोरण विषयक अध्ययन करण्यात आले आहे.



**प्रस्तावना**

भारत देश हा प्रगल्भ सांस्कृतिक वारसा असणारा देश आहे. या आधुनिक काळातही प्रगतीच्या मार्गावरून चालतांना भारतीय व्यक्ती त्या सर्व सांस्कृतिक मूल्यांचे जतन करीत असतो. वैदिक काळात निर्माण झालेल्या ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेदाचा भारतीय संस्कृती संवर्धनात महत्त्वाचा वाटा आहे. या चार वेदांपैकी अथर्ववेदामध्ये आयुर्वेदिक उपचार पद्धती ही लोकांच्या शुद्ध विचारसरणीसाठी, शुद्ध आचरणासाठी आणि सात्त्विक व संपूर्ण जीवनपद्धतीसाठी प्रतिपादन केलेली आहे.

धर्माची स्थापना, अर्थार्जन आणि दिव्य इच्छेने संपत्तीची उत्पत्ती या माध्यमातून मोक्षप्राप्ती करणे त्या चतुर्वेविध पुरूषार्थ प्राप्तीसाठी सर्वोपरी निरोगी असणे आवश्यक असते. जर शरीर रोगग्रस्त असेल तर तेथे सुखशांती व आनंद कोठे असणार? मनुष्याजवळ धन, ऐश्वर्य आहे, पण शरीरात योग्य रक्तसंचार होत नसेल तर मन व शरीर स्वस्थ कसे राहणार? ते निरोगी ठेवण्यासाठी आयुर्वेदाची निर्मिती झाली, जे आजही उपयोगी आहे. शरीराच्या आतील मल आणि दोष दूर करणे, आंतरिक शुद्धीकरण करून समाधीच्या माध्यमातून परमानंद मिळण्यासाठी ऋषिमुनी आणि योगी पुरूषांनी आयुर्वेदाचा आविष्कार केलेला आहे

आजच्या काळात जगातील एकूण लोकसंख्येचा विचार करता भारत हा सर्वाधिक लोकसंख्या असणारा दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. भारताची लोकसंख्या १२५ कोटी आहे.

तसेच भारत हा विकासनशील देश आहे. या सर्व घटकांचा परिणाम भारतीय व्यक्तींच्या आजच्या जीवनशैलीवर झालेला दिसून येतो. अनेक शारीरिक व्याधींसोबत दिवसेंदिवस वाढणाऱ्या मानसिक व्याधी हयाच जीवन पद्धतीचा परिणाम होय.

वेदकालीन ऋषीमुनींनी सांगितलेल्या योग, प्राणायाम तसेच आयुर्वेदाच्या रहस्यामुळे प्रत्येक भारतीय व्यक्ती शारीरिक, बौद्धिक, मानसिक व नैतिकदृष्टया सुदृढ राहून संपूर्ण भारत देशाच्या सुदृढतेसाठी आणि विकासासाठी महत्वाचे योगदान देवू शकतो. भगवान श्री धन्वंतरी हे देवांचे वैद्य मानले जातात. वैदिक काळापासून भरद्वाज, आत्रेय, पूणर्वावसू, पातंजली, सुश्रुत या महान योगगुरूंचे आयुर्वेद शास्त्रात महत्वाचे योगदान आहे.

**सारणी क्रमांक १: कच्च्या मालाच्या स्वरूपात औषधी वनस्पतीच्या स्त्रोतांच्या वापराची टक्केवारी**

| औषधी वनस्पतीचे स्त्रोत | संख्या | मध्यमान | मा.वी. | थ्कमान | कमाल | F | P |
|---|---|---|---|---|---|---|---|
| स्वत: लागवड केलेल्या वनस्पती | ३६ | १३.६ | ±७.४१ | ९ | २३ | 18.75 | <0.05 |
| स्वत: वनस्पती गोळा करण | ८९ | १९.३ | ±४.८१ | ११ | २४ | | |
| खाजगी उत्पादक | १०१ | ७२.६ | ±९.२३ | ५७ | ८९ | | |
| खाजगी विक्रेते | ११३ | २३.५ | ±२.१४ | २० | २५ | | |
| स्थानिक बाजार | २९ | ८.४ | ±२.४९ | ६ | १२ | | |

मा.वी.- मानक विचलन; F- F मूल्य; P- P मूल्य

वरील सारणी क्रमांक १ मध्ये कच्च्या मालाच्या स्वरूपात औषधी वनस्पतीच्या स्त्रोतांच्या वापराच्या टक्केवारीसंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार औषधी उत्पादकांद्वारे स्वत: लागवड केलेल्या औषधी वनस्पतींचा वापर करण्याची सरासरी टक्केवारी १३.६±७.४१ टक्के (९ टक्के व २३ टक्के दरम्यान) असून औषधी उत्पादकांद्वारे औषधी वनस्पती स्वत: गोळा करून वापरण्याची सरासरी टक्केवारी १९.३±४.८१ टक्के (११ टक्के व २४ टक्के दरम्यान) असल्याचे दिसून आले. त्याचप्रमाणे औषधी उत्पादकांद्वारे औषधी वनस्पती खाजगी उत्पादकांकडून विकत घेऊन वापरण्याची सरासरी टक्केवारी ७२.६±९.२३ टक्के (५७ टक्के व ८९ टक्के दरम्यान) असून औषधी उत्पादकांद्वारे औषधी वनस्पती खाजगी विक्रेत्यांकडून विकत घेऊन वापरण्याची सरासरी टक्केवारी २३.५±२.१४ टक्के (२० टक्के व २५ टक्के दरम्यान) तर औषधी उत्पादकांद्वारे औषधी वनस्पती स्थानिक बाजारातून खरेदी करून वापरण्याची सरासरी टक्केवारी ८.४±२.४९ टक्के (६ टक्के व १२ टक्के दरम्यान) असल्याचे दिसून आले. औषधी वनस्पतींच्या विविध स्त्रोतांच्या वापराच्या सरासरी टक्केवारीची तुलना केली असता स्त्रोतांच्या वापरादरम्यान सार्थक ($F= 18.75$; $P<0.05$) फरक आढळून आला. वरील माहितीवरून आयुर्वेदिक उद्योगात उपयोगी औषधी वनस्पती करिता खाजगी उत्पादक या स्त्रोताचा वापर मोठ्या प्रमाणात होत असल्याचे निदर्शनास आले.

**सारणी क्रमांक २:**
**कच्च्या मालाच्या नगद व उधारी खरेदीच्या टक्केवारीसंबंधी माहिती**

| कच्च्या मालाच्या नगद व उधारी खरेदीची टक्केवारी | संख्या | मध्यमान | मा.वी. | किमान | कमाल | Z | P |
|---|---|---|---|---|---|---|---|
| नगद | १२० | ७९.८ | ±१२.७ | ५२ | ८५ | 24.58 | <0.05 |
| उधार | ११० | २३.६ | ±९.६ | १२ | ३६ | | |

मा.वी.- मानक विचलन; Z- Z मूल्य; P- P मूल्य

वरील **सारणी क्रमांक २** मध्ये आयुर्वेदिक औषधी उद्योगात कच्च्या मालाच्या नगद व उधारी खरेदीच्या टक्केवारीसंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार आयुर्वेदिक औषधी उद्योगातील कच्च्यामालाच्या एकूण खरेदीपैकी सरासरी ७९.८±१२.७ टक्के (५२ टक्के ते ८५ टक्के दरम्यान) खरेदी ही नगदी स्वरूपात केली जात असून सरासरी २३.६±९.६ टक्के (१२ टक्के ते ३६ टक्के दरम्यान) खरेदी ही उधारी स्वरूपात केली जात असल्याचे निदर्शनास आले. आयुर्वेदिक औषधी उद्योगात लागणाऱ्या कच्च्या मालाच्या नगद व उधारी खरेदीच्या टक्केवारीची तुलना केली असता खरेदीच्या स्वरूपात महत्वपूर्ण ($Z=24.58$; $P<0.05$) अंतर दिसून आले.

**सारणी क्रमांक ३:**
**आयुर्वेदिक औषधी उद्योगात कच्चा माल खरेदी करण्याच्या पद्धतीसंबंधी माहिती**

| कच्चा माल खरेदी करण्याची पद्धत | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| थेटप्रासंगी खरेदी | ११० | ९२ |
| करार तत्वावर खरेदी | १२० | १०० |
| निविदाद्वारे खरेदी | २९ | २४ |

वरील **सारणी क्रमांक ३** मध्ये आयुर्वेदिक औषधी उद्योगात कच्चा माल खरेदी करण्याची पद्धतीसंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. वरील सारणीत असे दिसून येते की, १०० टक्के आयुर्वेदिक औषधी उद्योगात कच्चा माल करार तत्वावर खरेदी करण्यात येत असून ९२ टक्के आयुर्वेदिक औषधी उद्योग कच्चा माल थेटप्रासंगी खरेदी करतात. तसेच २४ टक्के आयुर्वेदिक औषधी उद्योग कच्चा माल खेरदी करण्याकरिता निविदा खरेदी पद्धतीचा वापर करीत असल्याचे आढळले.

## निष्कर्ष

वरील माहितीवरून आयुर्वेदिक औषधी उद्योगात कच्च्या मालाच्या खरेदीकरिता एकापेक्षा अधिक खरेदी पद्धतीचा वापर करण्यात येते असे आढळून आले. तथापी सर्वच औषधी उद्योगात कच्च्या मालाची खरेदी मुख्यत्वे करार तत्वावर करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले. आयुर्वेदिक औषधी उद्योगात कच्च्या मालाची खरेदी मूख्यत्वे नगदी स्वरूपात केली जात असल्याचे निदर्शनास आले. औषधी वनस्पतींच्या विविध स्त्रोतांच्या वापराच्या सरासरी टक्केवारीची तुलना केली असता स्त्रोतांच्या वापरादरम्यान सार्थक ($F= 18.75$; $P<0.05$) फरक आढळून आला. वरील माहितीवरून आयुर्वेदिक उद्योगात उपयोगी औषधी वनस्पती करिता खाजगी उत्पादक या स्त्रोताचा वापर मोठ्या प्रमाणात होत असल्याचे निदर्शनास आले.

## संदर्भ ग्रंथ सूची

१. डॉ. आगलावे प्र. समाजिक संशोधन पद्धती शास्त्रे व तंत्रे,श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.
२. डॉ. कानेटकर मे,, आंतरराष्ट्रीय विपणन, श्रीसाईनाथ प्रकाशन, नागपूर, २००८
३. डॉ. कऱ्हाडे पी. एम., शास्त्रीय संशोधन पद्धती पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.
४. डॉ. देशकर व डॉ. देशपांडे, सांख्यिकीय पद्धती, पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिकेशन, नागपूर.
५. डॉ. भांडारकर पु. ल., समाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, औरंगाबाद.
६. डॉ. रानडे सु. व डॉ. परांजपे गो :आयुर्वेदाचा इतिहास, प्रोफिशन्ट पब्लिशिंग हाऊस, पुणे